## Organized Training Programme for Navodaya School Student

डि.सी.पी.ई. योग विभागात दि. १२ फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारी या दरम्यान श्री जवाहर नवोदय विद्यालय अमरावती येथे ११ वी विज्ञान विद्यार्थ्याकरिता १० दिवसीय ट्रेनिंग प्रोग्राम राबविण्यात आला होता.

४० विद्यार्थ्यांनी रोज सकाळी ७ ते ९.३० वेळेस योग विभागात येऊन ज्यामध्ये आसन, प्राणायाम, सुक्ष्म व्यायाम, शुध्दीक्रिया, ध्यान, प्रार्थना इत्यादी नियमित शिकविण्यात आले व त्यांची प्रात्याक्षिक व तात्विक प्रशिक्षण घेण्यात आली.

**H.V.P. Mandal's**

# Degree College of Physical Education, Amravati

**(Multi Faculty Autonomous College)**

# Department of Yoga

| | |
|---|---|
| Name/Title of Programme | Advancture Sport Training Camp |
| Date. | From 20 to 23 March 2024 |
| Time. | From 5.30 am To 9.45 pm |
| Venue. | Girijan Sharrik Shikshan Maha., Uppar Plato Chikhaldara, Amravati |
| No.- of Participants | M: 36 F: 16 **Total: 52** |
| Organizing Secretary | Dr. S. M. Labde HOD, Department of Yoga, DCPE Amravati |
| Organizing Committee Members | Mr. Sandip Mandale, Sh. Vijay Ganjare, Sh. Pratik Pathare, Sau. Archana Deshpande. Ms. Sampada Agarkar Sh. Hemant Bakshi, Sh. Atul Nimbekar Sh. Gokul Solkar, Sh. Sumit Sh. Shivam |
| Vote of Thanks | Sh. Sanjay Waghmare, Yoga Teacher HVPM, Amravati |

# Advancture Sport Training Camp

(वारसा सहल व प्लास्टिक मुक्त गाविलगड)

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अमरावती आणि भारतीय ज्ञान परंपरा केंद्र अमरावती यांच्या संयुक्त विद्यामानानाने दिनांक २१ मार्च २०२४ ला चिखलदारा येथील किल्ले गाविलगड येथे वारसा सहल व प्लास्टिक मुक्त गाविलगड हा उपक्रम राबविण्यात आला.

हा एक महत्वाचा उपक्रम आहे जो विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी जपता यावी व आपल्या गौरवशाली इतिहासाचा साक्षात्कार व्हावा याकरिता भारतीय पुरातत्व विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम घेण्यात आला, २१ तारखेला सकाळी 7 वाजता किल्ल्याच्या मच्छली दरवाज्या पासून या मोहिमेला सुरवात झाली. या सर्व मोहीम दरम्यान किल्ल्यातील सुमारे दोन गारबेज बॅग प्लास्टिक कचरा विद्यार्थ्यांनि गोळा केला.

किल्ल्याच्या इतिहासाविषयी मार्गदर्शन प्रा. प्रतीक पाथरे यांनी केले तसेच या उपक्रमाचे मुख्य आयोजन डॉ सुनील लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडले सोबतच डिग्री कॉलेज येथील प्रा संदीप मांदळे, प्रा अर्चना देशपांडे, प्रा. संपदा आगरकर, प्रा. विजय गांजरे उपस्थित होते. या उपक्रमात महाविद्यालयातील एकूण ५२ विद्यार्थी व १६ विद्यार्थीनि उपस्थित होत्या. या उपक्रमाला श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकर राव वैद्य, आई के एस च्या समन्वयिका डॉ माधुरिताई चेंडके, डी. सी. पी. इ. चे प्राचार्य डॉ श्रीनिवास देशपांडे, डॉ सुनील लाबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले

पारंपरिक खेळाचे प्रदर्शन व स्पर्धा

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अमरावती आणि भारतीय ज्ञान परंपरा केंद्र अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक २१ ते २३ मार्च २०२४ ला चिखलदारा येथील गिरिजन शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे विविध पारंपरिक खेळाचे आयोजन करण्यात आहे.

हा एक महत्वाचा उपक्रम आहे ज्यामध्ये विद्यार्थ्यांना आपले बालपण जपता यावे बालपणाच्या आठवणी पुन्हा जागृत व्हाव्या त्यांना लुप्त झालेल्या काही खेळाची माहिती व्हावी ह्या उद्देश होता.

विटी दांडू, लंगडी, लगोरी, तिर-कमान, कंचे, वाघबकरी, शुटटींग सारख्या अनेक पारंपरिक खेळाचे ज्ञान, नियमावली विध्यार्थ्यांना सांगून त्यांची स्पर्धा घेण्यात आली.

योग व पारंपरिक खेळ विभाग प्रमुख व IKS चे सह समन्वयक डॉ सुनील लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व खेळ व स्पर्धा घेण्यात आल्या विद्यार्थ्यांनी खूप आनंदाने स्पर्धेत सहभाग नोंदविला

या उपक्रमाचे मुख्य आयोजन डॉ सुनील लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडले सोबतच डिग्री कॉलेज येथील प्रा संदीप मांदळे, प्रा अर्चना देशपांडे, प्रा. संपदा आगरकर, प्रा. विजय गांजरे यांनी केले . या उपक्रमात महाविद्यालयातील एकूण ५२ विद्यार्थी व १६ विद्यार्थीनि उपस्थित होत्या. हा उपक्रम श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकर राव वैद्य, आई के एस च्या समन्वयिका डॉ मधुरिताई चेंडके, डी. सी. पी. इ. चे प्राचार्य डॉ श्रीनिवास देशपांडे, डॉ सुनील लाबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले

पतंजली योग सूत्र पठण

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अमरावती आणि भारतीय ज्ञान परंपरा केंद्र अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक २१ व २२ मार्च २०२४ ला चिखलदारा येथील शिवसागर पॉईंट, देवी पॉईंट व गिरिजन महाविद्यालय येथील मनुमान मंदिर येथे महर्षी पतंजली रचित पातंजल योग सूत्र या पौराणिक ग्रंथाचे पठाण घेण्यात आले.

सुमारे २२०० शे वर्ष पूर्वी विभिन्न ग्रंथात विखुरलेला योग महर्षी पतंजली यांनी एकत्रित आणून त्या योग्य विधेला सूत्रबद्ध करून योग्य सूत्र हा ग्रंथ रचिला.

पातंजल योगसूत्र मध्ये चार पाद (प्रकरण) असून ऐकून १९५ सूत्र आहेत.

२१ मार्च २०२४ ला देवी पॉईंट येथे सकाळी ६.३० ते ७.३० या काळात व २२ मार्च २०२४ ला शिवसागर पॉईंट येथे पतंजली योगसूत्र पठण घेण्यात आले २२ मार्च २०२४ ला गिरिजन शारीरिक शिक्षण महाविषयालायाच्या प्रागंणा मधील हनुमान मंदिर येथे प्रा. डॉ सुनील लबडे, प्रा. प्रतीक पाथरे व प्रा. संदीप मांदळे यांनी पतंजली योगसूत्राचा अर्थ विध्यार्थ्यांना सांगितला.

या मध्ये ४७ विद्यार्थी व १५ विद्यार्थिनी भाग घेतला या वेळी डॉ अतुल निंबकर, प्रा अर्चना देशपांडे, प्रा. संपदा आगरकर, प्रा. विजय गांजरे, प्रा. बक्षी श्री गोकुळ सोलकर उपस्थित होते.

H.V.P. Mandal's

# Degree College of Physical Education, Amravati

(Multi Faculty Autonomous College)

## Department of Yoga

| | |
|---|---|
| Name/Title of Programme | Grishm Kalin Yoga & Nisargupchar Shibir, Chikhaldara |
| Date. | From 11 to 20 May 2024 |
| Time. | From 5.30 am To 9.45 pm |
| Venue. | Girijan Sharrik Shikshan Maha., Uppar Plato Chikhaldara, Amravati |
| No.- of Participants | M: 24 F: 45 **Total: 69** |
| President of function with Designation (Opining Ceremony) | Dr. Arun Khodaskar |
| Inaugurator of function with Designation | Sh. Ashraf Bhai Social Worker, Chikhaldara |
| Chief Guest | Sh. Martad Newaskar, Pradeshik Parivhan Adhikari, Chikhaldara |
| President of function with Designation (Oclosing Ceremony) | Ms. Maya Mane, Tahasildar, Chikhaldara |
| Organizing Secretary | Dr. S. M. Labde HOD, Department of Yoga, DCPE Amravati<br>Sh. Nitin Kale Asstt. Prof. DCPE Amravait |
| Organizing Committee Members | Mr. Sanjay Waghamare, Pravin Anasane Asstt. Prof. DCPE Amravait, Himanshu Gaikwad |
| Name of Anchors (संचालन) | Mr. Manoj Dangare Chandrapur |
| Vote of Thanks | Sh. Sanjay Waghmare, Yoga Teacher HVPM, Amravati |

## ग्रिष्मकालीन योग व निसर्गोउपचार शिबिर, चिखलदरा

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ,अमरावती द्वारा संचालीत अप्पर प्लेटो, चिखलदरा येथे 49 वे उन्हाळी योग व निसर्गोउपचार शिबिराचे आयोजन दिनांक 11 मे 2024 ते 20 मे 2024 मे या कालावधीत करण्यात आलेले असून या शिबिरात चंद्रपूर,नागपूर,अकोला,अमरावती, छ. संभाजी नगर या जिल्याहातील 12 वर्षापासून ते 70 वर्षापर्यंतचे महिला व पुरुष शिबिराथी मोठ्या उत्साहाने सहभागी झालेले आहेत.

मे महिन्यातील विदर्भातील उष्णतेच्या दाहकतेने मनुष्याचा जीव लाही - लाही होतो.त्याचं कालावधीत निसर्गरम्य, शांत ,थंड वातावरणात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ,अमरावती,यांच्या चिखलदरा येथील निसर्गोउपचार केंद्र येथे सकाळी 5.30 वाजेपासून ते रात्री 9.45 वाजेपर्यंत शिबीराची दैनंदिनी आहे.

यामध्ये सकाळी व सायंकाळी पदभ्रमण, ध्वजरोहण, प्रार्थना, योगा, पोष्टीक नास्ता, व्याख्यान,चर्चासत्रे, प्रात्याशिक ,निसर्गोउपचार,भोजन, अनुभवकथनं, शिबिराथ्याचे सांस्कृतिक कार्यक्रम, शंका समाधान, प्रश्नमंजूशा,गीतापाठ इत्यादी बाबीचा समावेश आहे.

निरोगी शरीरात,निरोगी मन वास्तव्य करते या उक्ती प्रमाणे पुढील आयुष्य सशक्त निरोगी आयुष्य कसे जगायचे या बाबीवर भर देण्यात आले. यामध्ये मसाज, मडबाथ, स्टीमबाथ , जल निती,इत्यादी प्रत्यक्षीक करून शिबिरात्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

नुकताच या शिबिराचे उदघाट्न झाले. या शिबिराचे उदघाटक म्हणून मा.श्री.अशरफभाई, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ता,चिखलदरा,प्रमुख पाहुणे म्हणून श्री. मार्तंड नेवस्कर, सेवानिवृत्त प्रादेशिक परिवहन अधिकारी.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा,श्री.अरुण खोडस्कर,सेवानिवृत्त प्राचार्य श्री.ह.व्या.प्र. मं.अमरावती हे मान्यवर उपस्तिथ होते.मान्यवरांचे पुष्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक प्रवीण अनासने यांनी केले, संचालन मनोज डांगरे,चंद्रपूर, आभार प्रदर्शन संजय वाघमारे, योगशिक्षक यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता शांतीपाठ ने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वैशाली केमे,हिमाशु गायकवाड,राजकुमार मावसकर,रोहित धुर्वे यांनी परिश्रम घेतले.











